वर्ष-०७ | अंक-३२ | मुंबई, मंगळवार २९ जून ते ०५ जुलै २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक •कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 दंडवसुलीसाठी पोलिस धडकणार घरी

3 → देवदर्शन घेऊन घरी निघाल्यानंतर वाटेतच काळाने गाठलं; अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

मुंबईतील 50 टक्क्यांपेक्षा अधिक लहान मुलांमध्ये आढळल्या अँटीबॉडीज ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# ...नाहीतर तिसरी दूरच करोनाची दुसरी लाटच उलटेल

## मुख्यमंत्र्यांचा गर्दी करणाऱ्यांना इशारा



करोनाच्या दुसऱ्या लाटेनं राज्यात थैमान घातलं होतं. अचानक उद्रेक झाल्यानं राज्यात दुसऱ्या लाटेच्या काळात अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. मात्र, आता दुसरी लाटही हळूहळू ओसरू लागली आहे. असं असलं, तरी डेल्टा प्लस या नव्या करोना विषाणुमुळे तिसरी लाट येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे राज्य सरकारने निर्बंध वाढवले असून, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही वाढत्या गर्दीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. "ऑक्सिजनचा तुटवडा, बेडचा तुटवडा आदींसाठी तारेवरची कसरत करत आपण दुसरी लाट थोपवली. खाली आणली. मात्र, दुसरी लाट पूर्णपणे संपलेली नाही. खाली आहे आणि स्थिरावली आहे. पण, आता पुन्हा गर्दी होऊ लागली आहे," असं सांगत मुख्यमंत्र्यांनी गर्दी करणाऱ्यांना धोक्याचा इशारा दिला. मालाड येथील कोविड केअर सेंटरचं उद्घाटन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झालं. यावेळी बोलताना मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले, "कलानगराला लागूनच एमएमआरडीएचा रस्ता झाला. त्यावर उड्डाणपूल झाला. मग धारावीचा रस्ता झाला. जिथे मोजक्याच गाड्या दिसत होत्या तिथंही आज वाहतूक कोंडी होत आहे. रहदारी वाढत असल्याने ट्राफिक वाढत चाललं आहे. त्यावर आज तोडगा काढला आहे. एमएमआरडीएचं कार्यालयं झालं, तिथं त्याचा फायदा झाला म्हणून ट्राफिक जाम होणाऱ्या ठिकाणी एमएमआरडीएची कार्यालये सुरू करायची का?, असं मिश्कील भाष्य मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी केलं. विस्तारत चाललेल्या मुंबईसाठी मार्ग काढले जात आहे, याबद्दल मी एमएमआरडीएचं मुंबईकरांच्या वतीने कौतुक करतो, असंही मुख्यमंत्री म्हणाले. "ट्राफिक जामवर कायम स्वरूपी तोडगा काढण्यात आला. त्याचप्रमाणे आणखी एक चांगली गोष्ट पूर्ण झाली आहे. मालाड येथे कोविड केअर सेंटर. आज लाट ओसरली आहे. आपल्याकडे बेड रिकामे पडले आहेत, तरी देखील हे तुम्ही का करता आहात? असा प्रश्न काहीजण विचारू शकतात. पण, असा प्रश्न विचारणाऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट येत नाही की, करोनाचा शिरकाव झाल्यानंतरच फिल्ड हॉस्पिटलचा विषय मांडण्यात आला ...पान २ वर...

**आपण दुसरी लाट थोपवली. खाली आणली. मात्र, दुसरी लाट पूर्णपणे संपलेली नाही, असं म्हणत मुख्यमंत्र्यांनी दुसरी लाट उलटण्याची व्यक्त केली भीती**

# मुंबै बँक घोटाळ्याचा तपास सुरु




मुंबई : मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजेच मुंबै बँकेतील कोटय़वधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी अखेर मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभागाने तपास सुरू केला आहे. या प्रकरणी अहवाल देणाऱ्या सहकार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याला आर्थिक गुन्हे विभागात पाचारण करण्यात आले होते. या अधिकाऱ्याकडून संपूर्ण माहिती घेण्यात आली असून आता तपास सुरू झाला आहे.

या प्रकरणी आर्थिक गुन्हे विभागाने सादर केलेला सी समरी अहवाल महानगर दंडाधिकाऱ्यांच्या ४७ व्या न्यायालयाने फेटाळला आणि पुनर्तपासाचे आदेश दिले. त्यानुसार तपास पुन्हा सुरू करण्यात आला आहे. या प्रकरणी सहकार विभागाने चौकशी अहवाल दिला असला तरी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभागाने प्रत्यक्षात काहीच तपास केला नाही, हे स्पष्ट झाले होते. या घोटाळ्यापैकी एक असलेल्या 'डिझास्टर रिकव्हरी साईट'च्या प्रकरणात कंत्राट देण्याबाबत झालेल्या गंभीर गैरव्यवहाराकडेही दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून येत आहे. या दिशेने आता आर्थिक गुन्हे विभागाने चौकशी सुरू केली आहे.

या प्रकरणी सादर झालेल्या अहवालात 'डिझास्टर रिकव्हरी साईट'चा घोटाळा नेमका काय आहे, हे स्पष्ट करण्यात आले आहे. डिझास्टर रिकव्हरी साईटचे नूतनीकरण वा ...पान २ वर...

# शरद पवारांच्या भेटीनंतर संजय राऊत यांची पहिली प्रतिक्रिया




मुंबई, 'महाविकास आघाडी सरकारमध्ये अजिबात संभ्रमावस्था नाही. अत्यंत सुरळीत सरळसोट आणि योग्य मार्गाने पुढे निघालेली आहे. सरकार पाच वर्षाचा कार्यक्रम पूर्ण करेल. बाहेर उगाचच संभ्रम पसरवले जातात ते कोण पसरवत आहे हे चांगलं माहिती आहे. पण अशा प्रकारच्या अफवा आणि भ्रम निर्माण करून या सरकारचा बाल बाका होणार नाही, अशी रोखठोक प्रतिक्रिया शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या भेटीनंतर दिली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत 2 दिवस बैठकीनंतर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर ...पान २ वर...

# गरजू व गरीब मुलांसाठी मिरा भाईंदर येथे सोशल राईट्स ने उपलब्ध केले इंडोर क्रिकेट मैदान



दिनांक : २५.०६.२०२१ भाईंदर उत्तन रोड वर मुर्धा या गावी सोशल राईट्स फाऊंडेशन च्या वतीने स्टार रायझींग स्पोर्ट्स फाऊंडेशन या नामवंत क्रिकेट अकॅडीमेने सदर मैदानाचे नियोजन केले . या कमी शिवसेनेच्या नगरसेविका संध्या पाटील यांनी आपली जागा या मैदानासाठी उपलब्ध करून दिली . आयुक्त श्री. दिलीप ढोले यांनी प्रत्यक्ष पहाणी करून शहनिशा करून या मैदानाला परवानगी दिली असताना काही विघ्नसंतोषी पत्रकारांनी खोट्या बातम्या पसरवल्या यामुळे आतापर्यंत मिरा भाईंदर मध्ये इंडोर क्रिकेट मैदान करण्यास कोणीही पुढे येत नव्हते . अश्यावेळी रीतसर कागदपत्रांची पूर्तता करून सोशल राईट्स फाऊंडेशन च्या वतीने स्टार रायझींग स्पोर्ट्स फाऊंडेशन ला पुढाकार देऊन सदर मैदान तयार करण्यात आले . या संस्थेचे संस्थापक व सोशल राईट्स फाऊंडेशन चे क्रीडा समितीचे अध्यक्ष नंदू जाधव हे नामवंत क्रिकेट ...पान ४ वर...

# दंडवसुलीसाठी पोलिस धडकणार घरी



वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध ई चलानद्वारे वाहतूक पोलिसांनी दंडात्मक कारवाई करूनही दंड भरला जात नाही. परिणामी दंडाच्या थकबाकीचा आकडा वाढत असून दहा हजार आणि त्यापेक्षा अधिक प्रलंबित असलेला दंड वसूल करण्यासाठी वाहतूक पोलिस थकबाकीदार वाहन मालकांच्या घरी नोटीस देण्यासाठी जाणार आहेत. शिवाय नियमांचे उल्लंघन केल्याबाबतचे पुरावेदेखील वाहन मालकाला दाखवणार असून भविष्यात वाहतूक नियमांचे पालन करण्याविषयीची समज दिली जाणार असल्याचे वाहतूक शाखेचे उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी सांगितले. सन २०१९च्या फेब्रुवारी महिन्यापासून ई चलानच्या माध्यमातून दंड आकारण्यात येत आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांच्या हातातील पावती पुस्तक जाऊन हातामध्ये मशीन आल्याने नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवरील दंडात्मक कारवाईच्या संख्येतही वाढ झाली. परंतु दुसरीकडे दंडाची थकबाकी प्रचंड वाढू लागली. वाहनमालक दंड भरत नसल्याने अनेक गाड्यांवरील थकीत दंडाची रक्कमही मोठी असून प्रलंबित दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी ठाणे वाहतूक शाखेने डिसेंबर २०२० आणि जानेवारी २०२१ दरम्यान विशेष मोहीम राबवली होती. या दोन महिन्यामध्ये ६ कोटी २५ लाखांचा दंड वसूल करण्यामध्ये पोलिसांना यश आले होते. दरम्यान, करोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे पुन्हा निर्बंध लागू करण्यात आले. अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी यांच्यासाठीच लोकलमधून प्रवास करण्याची मुभा असल्याने रस्त्यावरील वाहतुकीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्याचबरोबर वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होण्याचेही प्रमाण वाढले असून १० हजार किंवा त्यापेक्षा अधिक प्रलंबित असलेला दंड वसूल करण्यासाठी पुन्हा एकदा वाहतूक शाखेने विशेष मोहीम सुरू केली आहे.

# मुंबईतील युद्धनौका मोठ्या मैत्री दौऱ्यावर

जगातील सर्वाधिक जलवाहतूक होणाऱ्या अरबी समुद्राशी संबंधित देशांवर सध्या नौदलाने लक्ष केंद्रित केले आहे. याअंतर्गत युद्धनौकांकडून तेथील देशांच्या नाविक तळांना वारंवार भेटी दिल्या जात आहेत. त्याअंतर्गतच आता 'आयएनएस तबर' ही युद्धनौका मुंबईहून एका मोठ्या मैत्री दौऱ्यासाठी निघण्यासाठी सज्ज आहे. 'आयएनएस तबर' ही फ्रिगेट श्रेणीतील युद्धनौका आहे. मैत्री दौऱ्याअंतर्गत ती आफ्रिका व समुद्राशी संबंधित देशांना भेट देईल. यादरम्यान, उत्तर-पूर्व आफ्रिका किनाऱ्यावरील जीबूती, इजिप्त, इटाली, मोरोक्को, फ्रान्स, यूके, रशिया, नेदरलॅण्ड्ससह स्वीडन व नॉर्वे या आर्टिक सर्कलजवळील देशांनाही ही नौका भेट देईल.

भारतीय नौदलाच्या ताफ्यातील एखादी युद्धनौका अनेक वर्षांनी इतक्या देशांच्या भेटीवर जात आहे. नौदलाने अरबी समुद्राशी संबंधित देशांशी मैत्री वाढविण्यावर लक्ष केंद्रित केल्याने या सर्व दौऱ्यांचे



युरोपातील महत्त्वाचे देश तसेच नाविक तळांना भेट देणार आहे. सप्टेंबरपर्यंत हा दौरा असेल. यादरम्यान ही युद्धनौका एडनचे आखात (येमेनजवळ), लाल समुद्र (दक्षिण इजिप्त) व सुएझ कालव्याला भेट देऊन भूमध्य समुद्रात प्रवेश करेल. तेथील देशांना भेटी देऊन जिब्राल्टरच्या (दक्षिण स्पेन) सामुद्रधुनीला वळसा घालून अटलांटिक समुद्रातून बाल्टिक नियोजन मुंबईत मुख्यालय असलेल्या पश्चिम नौदल कमांडकडूनच केले जात आहे.

तीन संयुक्त सरावांमध्ये सहभाग

या देशांच्या भेटीखेरीज 'आयएनएस तबर' ही तीन महत्त्वाच्या संयुक्त सरावांमध्येही भाग घेणार आहे. युकेच्या नौदलासह 'कोकण सराव', फ्रान्सच्या नौदलासह 'वरुण सराव', तर रशियाच्या नौदलासह 'इंद्र सराव' वेगवेगळ्या समुद्रात होणार आहे.

# व्हॉटसअॅपवर स्टेटस ठेवताना काळजी घ्या! पुण्यात एकाला अटक

मित्रमंडळींना माहिती म्हणून किंवा कधी तरी इम्प्रेशन मारण्यासाठी व्हॉट्सअॅपवरील डीपी आणि स्टेटस (Whatsapp Status) अनेक जण बदलत असतात. त्यावर चित्रविचित्र फोटो ठेवत असतात. असे स्टेटस ठेवताना जपून राहण्याची गरज आहे. कारण, हातात शस्त्र घेऊन व्हॉट्सअॅपवर स्टेटस ठेवणं पुण्यातील एका व्यक्तीच्या अंगलट आलं आहे. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्याला अटक केली आहे. त्याच्याकडून कोयता जप्त करण्यात आला आहे.

वाचा:सुप्रिया सुळे यांच्या समोरच 'अजित पवार मुर्दाबाद'च्या घोषणा

अनिकेत साठे (रा. आंबेडकरनगर, चंदननगर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्याच्यावर भारतीय शस्त्रास्त्र कायदानुसार, चंदननगर पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे हवालदार दीपक भुजबळ यांना याविषयी माहिती मिळाली होती. चंदननगर परिसरात राहणारा अनिकेत साठे याने हातामध्ये शस्त्र घेऊन उभा असल्याचे स्टेटस व्हॉट्सअॅपवर ठेवले आहे. तो चंदननगर येथील पाण्याच्या टाकीजवळ थांबला आहे. त्याच्याकडे शस्त्र आहे. ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या पथकाने सापळा रचून साठे याला ताब्यात घेतले. त्यावेळी त्याच्याकडे कोयता आढळून आला.




MIRA BHAYANDER MUNICIPAL CORPORATION

Garden & Tree Authority Department

Gr. Floor Ward committee No. 04, Vilasrao Deshmukh Bhavan, Jangid Enclave Kankia, Miraroad (East) Tal.Dist.- Thane. 401107 Tel.No. 28103409

Ref.no/MBMC/Tree authority/ 230 /2021-22 Date:- 24 / 06 /2021

// TENDER NOTICE //

Mira Bhayander Municipal Corporation Garden Department invites sealed tender form for following work in two envelope system at the day 05 / 07 / 2021 up to 1.00 pm. The tender form and other relevant document will be available for download on **https://mahatenders.gov.in** from the date 28 / 06 / 2021 to 05 / 07 / 2021 till 1.00 pm. The tender shall be opened in the presence of the bidders or their representatives on the day 06 / 07 / 2021 at 01.00 Pm at the tender cell of mira Bhayander municipal corporation.

| Sr. no | Name of work | Estimate Cost | Earnest Money Deposit (EMD | Cost of tender documents |
|---|---|---|---|---|
| 1. | Prepairing Lawn at Reservation No. 178 Ground at Mira road East in MBMC jurisdiction | Rs.21,29,976/- (Rs . Twenty one Lack Twenty nine Thousand Nine Hundred Seventy six only) | Rs.21,300/- (Rs. Twenty one Thousand Three Hundred only) | Rs. 500+90 (GST)= 590/- (Rs. Five Hundred Ninety Only) Non Refundable |

NOTE :-
1) Tender form should be submitted through Online System in two envelope
2) Tender form fee not refundable.
3) Hon. Commissioner of Mira Bhayander Municipal Corporation has reserve Right to reject any or all bids, without assigning any reasons.
4) The Period of tender law admissibility is 120 days.

Ref No.: MBMC / PRO / 170 / 2021-22

Date : 24 / 06 / 2021

Sign/-

Dy Commissioner (Garden)

Mira Bhayander Municipal Corporation


# बेकायदा ऑनलाइन लॉटरीच्या विळख्यात तरुणाई




ठाण्यातील काही ठिकाणी सुरू असलेल्या बेकायदेशीर ऑनलाइन लॉटरीचा तरुणाईला विळखा पडला असून तरुणाईला वाईट प्रवृत्तीपासून वाचविण्यासाठी या बेकायदा ऑनलाइन लॉटरीवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले यांनी पोलिस आयुक्तांकडे केली आहे.

**मुंबई-ठाण्यात बेकायदा**

ऑनलाइन लॉटरी व्यवसाय जोमाने सुरू आहे. त्यातून राज्य सरकारचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. त्याचबरोबर ऑनलाइन लॉटरीच्या अधीन गेलेल्या तरुणांच्या संख्येतही लक्षणीय वाढ होत आहे. सध्या करोना आपत्तीच्या काळात अनेक कुटुंबांची आर्थिक स्थिती खालावली आहे. अशा परिस्थितीत घरात वाद घालून अनेक तरुण पैसे घेतात आणि लॉटरीमध्ये नशीब आजमाविण्यासाठी येतात. त्यात बहुसंख्य तरुणांना आर्थिक फटका बसतो. त्यातून गुन्हेगारी वृत्तीतही वाढ होऊन सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येण्याची भीती आहे.

त्यामुळे शेकडो सामान्य कुटुंबांबरोबरच तरुणाईला वाचविण्यासाठी ऑनलाइन लॉटरीवर कारवाई करण्याची गरज असल्याचे वाघुले यांचे म्हणणे आहे. याबाबत वाघुले यांनी पोलिस आयुक्त डॉ. जयजीत सिंग यांना निवेदन दिले आहे.

## पृष्ठ १ वरुन

### ...नाहीतर तिसरी दूरच

होता. देशातील पहिलं फिल्ड हॉस्पिटल वांद्रे-कुर्ला संकुलात उभारण्यात आलं. त्याची क्षमता दोन हजार रुग्णांची आहे. अशी सेंटर राज्यभर केली जात आहेत," असं मुख्यमंत्री म्हणाले. "आज गरज नसताना असं का केलं जात आहे, असा सहज प्रश्न कुणालाही पडेल, पण तसं नाही. दुसरी लाट बघितली, तर ऑक्सिजनचा तुटवडा, बेडचा तुटवडा आदींसाठी तारेवरची कसरत करत आपण दुसरी लाट थोपवली. खाली आणली. मात्र, दुसरी लाट पूर्णपणे संपलेली नाही. खाली आहे आणि स्थिरावली आहे. पण, आता पुन्हा गर्दी होऊ लागली आहे. तिसरी लाट कधी येईल हे सांगता येत नाही. पण गर्दी पहाता दुसरी लाट उलटेन का? हा मोठा धोका आहे. याचं कारण दुसऱ्या लाटेचा विषाणू डेल्टा आहे. आणि आता डेल्टा प्लस आढळून आला आहे. डेल्टा प्लसने अजून रंग दाखवलेले नाहीत. पण, डेल्टाच अजूनही राज्यात आहे. गर्दी टाळली गेली नाही, तर दुसरी लाट ओसरण्याऐवजी उलटेन. ही शक्यता गृहित धरली, तर आज जे आपण करतो आहोत, त्याचं महत्त्व नागरिकांच्या लक्षात येईल," असा इशारा देत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वाढत्या गर्दीबद्दल चिंता व्यक्त केली.

### मुंबै बँक घोटाळ्याचा

उभारणी करण्याच्या नावाखाली बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ, सरव्यवस्थापक आदींनी बनाव रचून पुण्यातील साईटला भेट देऊन पाहणी केल्याचे दर्शविले आहे. परंतु प्रत्यक्षात ज्याला कंत्राट द्यायचे होते त्यालाच ते देण्यात आले. इतकेच नव्हे, तर कंत्राटापोटी ९० टक्के रक्कम तात्काळ उपलब्ध करून देण्यात आली, याकडेही अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे. या प्रकरणी बँकेने वृत्तपत्रात जाहीर नोटीस दिली असती तर बाजारातील अनेक पुरवठादारांची इरादापत्रे सादर झाली असती आणि तुलनात्मक स्थिती कळू शकली असती. परंतु असे न करता बँकेने बनवलेल्या बनावट तालिकेवरीव ठराविक बनावट कंपन्यांकडून कोटेशन मागविण्यात आले, ही गंभीर बाब असल्याचे अहवालात नमूद आहे. मे. एस. एन. टेलिकॉम, मे. एस. एन. टेलिसिस्टिम, मे. ई. एस. इन्फोटेक आणि मे. मल्टिस्टार यापैकी मे. एस. एन. टेलिकॉम या कंपनीचा दर ५.४० कोटी हा सर्वाधिक कमी असल्याचा बनाव संचालक मंडळ सभेत करण्यात आला. याबाबतचा विषय मूळ विषयपत्रिकेवर नसतानाही केवळ अध्यक्षांच्या परवानगीने मंजूर करण्यात आला आहे, ही संशयास्पद बाब असल्याचे अहवालातच नमूद आहे. बँकेच्या तालिकेवर येण्यासाठी जी कागदपत्रे सादर करण्यात आली त्यामध्ये डीआर सिस्टिम सुविधा असल्याचा उल्लेख न केलेल्या कंपनीला हे कंत्राट देणे म्हणजे फसवणूक करून संचालक मंडळाने आर्थिक हितसंबंध जपल्याचे दिसून येते, याकडेही अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे. या चार कंपन्यांपैकी मे. एस. एन. टेलिकॉम, मे. एस. एन. टेलिसिस्टिम या कंपन्या एकच असून पत्ता व मालक के. सुरेश उर्फ सुरेश बंगेरा हे आहेत. मे. ई. एस. इन्फोटेक ही कंपनी मे. एस. एन. टेलिकॉमच्या एका कर्मचाऱ्याची आहे तर मे. मल्टिस्टार या कंपनीबाबत काहीही उल्लेख नाही, याकडेही अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे. परंतु याची साधी चौकशीही आर्थिक गुन्हे विभागाने केली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

### शरद पवारांच्या भेटीनंतर

माध्यमांशी बोलत असताना राऊत यांनी भेटीबद्दल खुलासा केला. 'संजय राऊत हे सामनाचे संपादक आहेत पक्षाचे नेते आहेत आणि खासदार आहेत त्यामुळे काही कारणास्तव आम्ही भेटलो त्यात आश्चर्य काय? सरकार अस्थिर होईल या भ्रमात कोणी राहू नये. मीडियाच्या माध्यमातून भ्रम निर्माण केले जात आहेत म्हणून वारंवार सांगावे लागते कारण तुम्हाला आता कृतीतूनच दिसेल की सरकार किती गंभीर आहे. बैठक ही चौकशीसाठी वगैरे नसते. शरद पवार हे महाविकास आघाडीचे प्रमुख मार्गदर्शक आहेत, शरद पवार यांनी तेच सांगितल आहे आणि उद्धव ठाकरे यांनीही तेच सांगितलं आहे, असंही राऊत म्हणाले. 'आमच्यात संशयास्पद वातावरण नाही भ्रम आहे. दिल्लीच्या बैठक यांचा इथे परिणाम होत नाही. महाविकास आघाडी सरकार स्वबळावरच आले आहे आणि राजकीय पक्ष स्वबळावर आले आहेत. इतर पक्षांमध्ये बैठका होत नाहीत का? पवारांना आणि मुख्यमंत्र्यांना भेटलो त्यात काय एवढे आश्चर्य काय? या बैठकीवर प्रश्नचिन्ह निर्माण करू नये, मुख्यमंत्र्यांना कोणीही भेटू शकतो. मुख्यमंत्री नव्हते तेव्हा मी रोजच भेटत होतो, आता ते मुख्यमंत्री आहेत. आम्ही रोज भेटतो, रोज फोनवर बोलतो चर्चा करतो, असंही राऊत म्हणाले.

'सूत्र जागी झाली असतील तर त्यांना जागं राहू द्या त्यांना झोपेची गोळी कधी द्यायची ते आम्ही पाहू. जर कुणी प्लॅन ए आणि प्लॅन बी केला असेल त्या सगळ्यांना मी सांगतो आमच्याकडे प्लॅन प्लस आहे' असा टोलाही राऊत यांनी लगावला.

'प्रताप सरनाईक शिवसेनेचे आमदार आहेत, त्यांना चुकीच्या पद्धतीने प्रकरणात त्रास दिला जात आहे यासंदर्भात बैठकीला एकनाथ शिंदे, अनिल परब आणि मी उपस्थित होतो. जर आमचा आमदार अडचणीत आला असेल आणि त्याला विनाकारण त्रास देत असतील तर काय मार्ग काढावा हे पाहावे लागेल. पक्ष पूर्णपणे प्रताप सरनाईक यांच्या पाठीशी आहे आणि राहणार, असंही राऊत यांनी ठणकावून सांगितलं.

संवाद माझ्याशी आहे आमदाराशी संवाद ठेवू नये का सगळ्या आमदारांचा मुख्यमंत्र्यांशी संवाद आहे. प्रताप सरनाईक आणि माझी चर्चा झालेली आहे. आत्ताचा मिनिटापूर्वी मी त्यांच्याशी बोललो, ते शिवसैनिक आहेत आणि शिवसेनेतच राहणार आहे, असंही राऊत म्हणाले.

# सायबर भामटय़ांकडून डॉक्टरची लाखोंची फसवणूक

**भामटय़ाने सांगितल्याप्रमाणे डॉक्टरांनी फॉर्ममध्ये त्यांच्या बँक खात्याची सर्व माहिती भरुन दिली.**



मुंबई : सीमकार्ड बंद पडणार असल्याची बतावणी करून एका डॉक्टरची सायबर भामटय़ांनी १० लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना दादर परिसरात घडली. याप्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. ६४ वर्षीय डॉक्टर बीएसएनएलचे सीमकार्ड वापरतात. त्यांच्या भ्रमणध्वनीवर शुक्रवारी दुपारी सीम कार्डसाठी आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता न केल्याने कार्ड बंद केले जाणार आहे, असा संदेश आला. त्यामध्ये एक संपर्क क्रमांक दिला होता. डॉक्टरांनी संदेशात दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधला. यावेळी समोरून बोलणाऱ्याने भ्रमणध्वनीवर एका फॉर्मची लिंक पाठविली. भामटय़ाने सांगितल्याप्रमाणे डॉक्टरांनी फॉर्ममध्ये त्यांच्या बँक खात्याची सर्व माहिती भरून दिली. ही माहिती प्राप्त होताच भामटय़ाने अर्ध्या तासात त्यांच्या खात्यातून परस्पर १० लाख २२ हजार रुपये वळते केले.



संपादकीय...

## काश्मीरमधल्या बंदुका कधी, कशा शांत होतील?

विजय दर्डा काश्मीरच्या खोऱ्यात मी अनेकदा आणि वेगवेगळ्या ऋतूंत गेलो आहे. त्या स्वर्गभूमीत पाऊल ठेवले रे ठेवले की, सम्राट जहांगिराने किमान ५०० वर्षांपूर्वी उच्चारलेले ते शब्द माझ्या कानात रुंजी घालू लागतात, “गर फिरदौस बर रुये जमीं अस्तहमीं अस्तो, हमी अस्तो, हमी अस्त”अर्थात जर भूलोकी कोठे स्वर्ग असेल तर तो येथे आहे, येथे आणि येथेच आहे!! पण त्याच वेळी वाटते, या स्वर्गाला कोणाची दृष्ट लागली असेल? ज्या आसमंतात सुफी तराणे गुंजत होते, तिथे बंदुकीच्या गोळ्या, ग्रेनेडचे आवाज का घुमू लागले असतील? काश्मीरच्या खोऱ्यात शांतता कशी परतेल? हा आजचा मोठा प्रश्न आहे. पंतप्रधान मोदी यांनी याबाबतीत घेतलेला पुढाकार स्वागतार्ह आहे आणि काश्मीरमधल्या सर्वपक्षीय नेत्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला ही समाधानाची गोष्ट! “तुम्ही आम्हाला नजरकैदेत ठेवले, मग तुमच्याशी चर्चेसाठी आम्ही का यावे?” असा प्रश्न न करता फारूक अब्दुल्लांपासून मेहबूबा मुफ्ती यांच्यापर्यंत सगळे नेते बैठकीला आले. योग्य वेळी लोकशाही प्रक्रिया सुरू केली जाईल, असे



आश्वासन पंतप्रधानांनी बैठकीत दिले.अर्थात, योग्य वेळ म्हणजे परिस्थिती पूर्ण नियंत्रणात आली की! तसाही जम्मू-काश्मीरच्या व्यवस्थेत केंद्राचा सहभाग सतत असतोच. काश्मीरच्या खोऱ्यात मुख्य प्रश्न घुसखोरांचा! ते पाकिस्तानातून येतात आणि नुकसान करतात. हे खोरे अशांत ठेवण्याचे काम कधी अमेरिकेचे हस्तक करायचे, तर कधी तालिबानच्या मदतीने पाकिस्तान! त्यासाठी पाकने कधी जैश ए मोहम्मदला पाळले तर कधी लष्करे तय्यबाला मांडीवर बसवले. अमेरिकन गुप्तचर संस्था सीआयए सध्या खोऱ्यात फारसे उद्योग करताना दिसत नाही. मात्र, पाक आणि चिनी गुप्तचरांच्या कारवाया सर्वांना ठाऊक आहेत. आजच्या घडीला काश्मीरमध्ये इस्लामिक स्टेट सक्रिय असणे ही सर्वाधिक चिंतेची बाब आहे. भारतीय सेना, अर्धसैनिक दले आणि जम्मू-काश्मीरचे पोलीस दहशतवाद्यांना रोखण्याचे काम करत आहेत. त्यात त्यांना बरेच यश मिळताना दिसते. परिस्थिती काहीशी सुधारली आहे. एकेकाळी तब्बल २४ वर्षे काश्मीर भारतापासून तुटलेले होते. नवी पिढी तर बंद खोल्यांमध्येच वाढली. लोकांची घरेदारे उद्ध्वस्त झाली. व्यापार-धंदे बसले. पर्यटन नष्ट झाले. लाखो काश्मिरी पंडित घरदार सोडावे लागल्याने विस्थापित झाले. पंतप्रधान मोदी यांनी ३७० वे कलम आणि ३५ ए समाप्त करण्याचे चांगले काम केले. या तरतुदी हटवणे ही काळाची गरज होती. कोणे एके काळी काश्मीरला भारताबरोबर ठेवण्यासाठी काही विशेष तरतुदी केल्या गेल्या होत्या. आता गरज न राहिल्याने त्या काढून टाकणेच इष्ट होते. देशात केवळ एकच झेंडा असला पाहिजे याचे समर्थन मी सदैव करत आलो आहे. देशाविरुद्ध काम करणाऱ्या, ज्यांच्या देशनिष्ठेबद्दल शंका आहे, अशा लोकांवर कारवाई झालीच पाहिजे; मग ते कोणीही असोत; पण म्हणून जम्मू-काश्मिरात सर्वच नेते दहशतवादी आहेत, असे समजण्याचे काही कारण नाही. दहशतवाद समर्थक नेत्यांना या बैठकीपासून दूर ठेवून “काश्मीरला भारतापासून अलग करण्याचे स्वप्न कधीही पूर्ण होऊ देणार नाही,” असा स्पष्ट संदेश पंतप्रधानांनी दिला, तेही उत्तम झाले. Aएकीकडे दहशतवाद्यांचा खातमा सुरू असतानाच दुसरीकडे आपण लोकशाही प्रक्रियेला गती दिली, तर अधिक बरे होईल. विधानसभा पुन्हा प्रस्थापित करणे फार फार आवश्यक आहे. निवडणुका झाल्या पाहिजेत आणि ‘राज्यपालांच्या हातातले बाहुले’ न होणारे लोकनियुक्त सरकार सत्तेवर आले पाहिजे. दिल्लीचे उदाहरण आपल्यासमोर आहे. तेथे सरकार तर आहे; पण सारे अधिकार नायब राज्यपालांच्या हातात दिसतात. लोकप्रतिनिधी जनतेच्या हिताचे निर्णय घेऊ शकत नसतील, तर त्या लोकशाहीला काय अर्थ उरला? लोकप्रतिनिधीच लोकांच्या भावना अधिक चांगल्या रीतीने समजू शकतात, त्यामुळे अधिकार त्यांच्याच हाती असले पाहिजेत. काश्मिरी जनतेसमोर रोजीरोटी, मुलांचे शिक्षण, आरोग्याचे मोठे प्रश्न आहेत. आकडे काही सांगोत; वास्तव वेगळे आहे, ते नाकारता येणार नाही.काश्मीरच्या खोऱ्यातील तरुण दहशतवाद्यांबरोबर जात असतील तर त्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे त्यांच्या हाताला काम नाही, म्हणून १०-२० हजारांसाठी ते प्राण पणाला लावायला तयार होतात. रोजगाराचे आकडे विश्वास ठेवण्याजोगे नाहीत. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीने सप्टेंबर २०२० मध्ये सांगितले की, देशात बेरोजगारीचा दर ६.७ टक्के आहे. मात्र, काश्मिरात तोच दर १६.२ टक्के आहे. २०२१ मध्ये त्याच संस्थेने म्हटले की हा दर घटून ९ टक्के झाला आहे. सहा महिन्यांत इतका फरक कसा पडू शकतो? दोन वर्षांपूर्वी काश्मिरात चतुर्थ श्रेणीच्या ८ हजार रिक्त पदांसाठी ५ लाख तरुणांनी अर्ज केला होता, यावरून बेरोजगारीचा अंदाज येऊ शकतो.

# तिकाटण्याची बागबुग!

भूतानचे राजे जिग्मे वांग्चुक यांचे कौतुक करावे तितके थोडे. राजे असूनही आणि म्हणून निवडून येण्याची चिंता नसूनही जिग्मे गेले काही महिने आपला डोंगराळ देश पायदळी तुडवत आहेत. यामागील उद्देश इतकाच की, करोनाकाळात आपल्या प्रजेची हालहवाल कशी आहे, ते टाळेबंदीस कसे तोंड देत आहेत आणि त्यांच्या अडचणी काय, हे जातीने समजून घेणे. या राजांचे आत्ता कौतुक करण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पुन्हा नव्याने जारी केलेले करोना निर्बंध. भूतानच्या तुलनेत महाराष्ट्राचा आकार सात-आठपटींनी जास्त. त्यामुळे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी भूतानच्या राजांप्रमाणे संपूर्ण राज्य पायदळी फिरणे अपेक्षित नाही. पण निदान त्यांनी करोनाकाळात जनतेच्या हालअपेष्टा अप्रत्यक्षपणे का असेना, किमान समजून घेण्यास हरकत नाही. तशा त्या घेतल्या असत्या तर गर्दीचा बागुलबोवा उभा करत अवघ्या तीन आठवडय़ांपूर्वी जाहीर केलेली नवी नियमावली त्यांनी स्वहस्तेच मोडीत काढली नसती. त्यांच्या या कृतीने महाराष्ट्र सरकारातील गोंधळाचे तर दर्शन घडतेच. पण यामुळे या तीनपेडी सरकारकडे धोरणधीरही नाही, हे दिसून येते.

धोरणधीर म्हणजे आपल्या धोरणांचे फलित काय हे पाहण्यासाठी करावी लागणारी प्रतीक्षा. तो नसल्याचे अनेकदा दिसून आले. तीनच आठवडय़ांपूर्वी मदत व पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी निर्बंध हटवण्याची घोषणा करताना घोळ घातला. आपली घोषणा मुख्यमंत्र्यांनी मागे घेतल्याचा पराजय या ‘विजया’स पाहावा लागला. त्यात परत हीच घोषणा २४ तासांच्या विलंबानंतर सरकारने केली. म्हणजे वडेट्टीवारांचे चूक होते म्हणावे, तर तोच निर्णय नंतर सरकारने उत्तररात्री जाहीर केला.

बरे, वडेट्टीवार यांची ही अवहेलना ते काँग्रेसचे आहेत म्हणून झाली असे मानावे, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे जितेंद्र आव्हाड यांचाही अनुभव असाच. मोठा गाजावाजा करून आपल्या पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते त्यांनी ‘म्हाडा’ची घरे टाटा कर्करोग रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची व्यवस्था म्हणून दिली खरी. पण मुख्यमंत्र्यांनी ती काढून घेतली.

एकदा दिलेले दान परत घेणे महापाप मानले जाते. हिंदुत्ववादी मुख्यमंत्र्यांना हे माहीत असणार. तरीही ते पाप त्यांनी केले. आणि नंतर दुसऱ्या ठिकाणची घरे या कामासाठी देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. यातून प्रशासनाची शालेय यत्ता तेवढी दिसून आली. निर्णय घेण्याआधी आणि तो जाहीर करण्याआधी त्यावर पुरेसा विचारविनिमय न झाल्याचे हे सारे निदर्शक. आता पुन्हा करोनाच्या तिसऱ्या लाटेसंदर्भातही तेच.

तीन आठवडय़ांपूर्वी नवी पंचस्तरीय नियमावली जेव्हा प्रसिद्ध केली गेली, तेव्हाही करोनाच्या नव्या लाटेची भीती होतीच. भारतीय भूमीत प्रसवलेला ‘डेल्टा’ की ‘डेल्टा प्लस’ हाच काय तो मुद्दा होता. तरीही प्रशासकीय प्रागतिकता दाखवत ही पंचस्तरीय नियमावली सरकारने अमलात आणली. ती स्वागतार्ह होती. कारण प्रत्येक नागरिकास आपण कोणत्या वर्गात आहोत हे त्यातून सहज उमगत होते आणि त्याप्रमाणे नियमनांस सामोरे जाण्याची त्याची तयारी होत होती. तीस प्रतिसादही चांगला मिळत होता. मग अचानक असे काय झाले की, या ‘डेल्टा प्लस’ने मुख्यमंत्र्यांचे पाय थरथरू लागले? जोपर्यंत देशात किमान ७० टक्के लसीकरण होत नाही तोपर्यंत डेल्टा प्लस, डेल्टा प्लस प्लस वगैरे येतच राहणार. पण त्यास प्रत्येक वेळी सामोरे जाताना महाराष्ट्र सरकारही असे ‘मायनस, मायनस’ होत जाणार काय? निर्बंधातून सुटून पोटापाण्याची व्यवस्था होईल अशी आशा राज्यातील उद्योग-व्यावसायिकांस जरा कोठे वाटते न वाटते तोच, पुन्हा नवे निर्बंध आणि तोच जुना उद्घोष : गर्दी टाळा.

ती कशी टाळायची याचा काहीही शास्त्रीय विचार नाही. हे पाण्याच्या नियमनासारखे आहे. पिण्याचे पाणी दिवसातून एक-दोन तासच ज्या प्रदेशात मिळते, तेथील नागरिक पेले-वाटय़ाही भरून ठेवतात (आणि दुसऱ्या दिवशी शिळे झाले या अत्यंत अशास्त्रीय समजातून ते ओतून नव्याने भरतात.. पुन्हा ओतण्यासाठी). याउलट, ज्या भागात चोवीस तास पाणीपुरवठा असतो तेथे असे होत नाही. म्हणजे निर्बंध उलट अपव्यय वाढवतात. त्यामुळे दुकानांच्या वेळा, प्रवाससंधी मर्यादित असल्या तर गर्दी वाढणारच. मुख्यमंत्री म्हणतात म्हणून ती अजिबात कमी होणार नाही. आणि



दुसरे असे की, घरातच बसायचे, काढे प्यायचे, वाफारे घ्यायचे, घरातल्या घरात असूनही मुखपट्टी वापरायची इत्यादी इत्यादी करायचे असेल तर करोनाबाधेची काय बिशाद? मग सरकारची आणि वैद्यकांची गरजच काय? पण अशी साजूक तुपातील आरोग्यदायी वगैरे जीवनशैली पाळणे सर्वांना परवडणारे नाही. तरीही त्यांनी ती पाळावी असा विचार करणे हे फ्रान्सच्या मेरी अँत्वानेतप्रमाणे ‘भाकरी परवडत नसेल तर केक खा’ म्हणण्यासारखे! त्यातून जनतेशी तुटलेली नाळ तेवढी दिसते.

ती जोडून घेणे दूरचे, पण निदान तिची सहवेदना जाणवून घ्यायची असेल तर मुख्यमंत्र्यांनी कामाच्या दिवशी भल्या सकाळी मुंबईच्या उपनगरांचा फेरफटका मारावा आणि लोकल प्रवासास बंदी असल्याने जनतेचे किती हाल होत आहेत ते स्वत:च्या डोळ्यांनी पाहावे. सरकारी निर्णयामुळे प्रवाशांना पाच-पाच तास रस्त्यावर प्रवासात घालवावे लागतात. यात महिलांचे किती हाल होतात हे सेनेच्या रणरागिणी वगैरे सांगू शकतील.

पण त्यासाठी त्यांना एक करावे लागेल. सरकारी सेवे(?)नंतरही मंत्रालय वा दक्षिण मुंबई परिसरात स्वत:साठी निवासस्थानांची बेगमी करणाऱ्या अधिकाऱ्यांपासून काही काळ त्यांना घटस्फोट घ्यावा लागेल. हा अधिकारीवर्ग नेहमीच कातडीबचावू असतो आणि साहेबाचा कल लक्षात घेत सुरक्षितपणे आपली मते मांडत असतो. त्यामुळे करोनाची तिसरी लाट, संभाव्य आणीबाणी वगैरे भाकडकथा रंगवून हा अधिकारी वर्ग ‘कडक नियमना’चे सल्ले देत असेल आणि मुख्यमंत्री ते मानत असतील, तर त्यात जनतेपेक्षा या अधिकारीवर्गाचे अधिक हित आहे, हे नि:संशय. म्हणून चांगला राजकारणी प्रसंगी या अधिकारीवर्गास बाजूस सारून स्वत:च्या राजकीय प्रेरणेने जनतेचा कानोसा घेत निर्णय घेतो.

करोनाकालीन परिस्थितीस सामोरे जाताना या अधिकाऱ्यांचा सल्ला आणि त्यानुसार कृती महाराष्ट्रासाठी उपयुक्त ठरली हे मान्य. त्यामुळे महाराष्ट्राची गत उत्तर प्रदेश वा तत्सम राज्यांप्रमाणे झाली नाही, हेही मान्य. पण युद्धकालीन सल्लागार शांतता काळात परिणामकारक ठरतातच असे नाही. किंबहुना ते तसे ठरत नाहीत हेच इतिहास दाखवून देतो. दुसऱ्या महायुद्धातील विजयी पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांना शांतता काळात ब्रिटिश मतदारांनी पराभूत केले, हे या समजाचेच निदर्शक. त्यामुळे विजयाचे पातेले खरवडत पुढची पन्नास वर्षे सत्ता करण्याची संधी चर्चिल यांना मिळाली नाही.

याचा अर्थ, करोनाच्या दुसऱ्या लाटेची यशस्वी हाताळणी ही तिसऱ्या संभाव्य लाट हाताळणीतील यशाची हमी देऊ शकत नाही. तेव्हा तेच ते टाळेबंदी, गर्दी नको वगैरे सल्ले आता पुरेत. नव्या परिस्थितीस सामोरे जायला नवे नियम लागतील. हे असे ‘नियम’ शोधण्याचे चातुर्य राजकीय पातळीवर उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादी-काँग्रेस यांच्याशी हातमिळवणी करून दाखवले. त्याचे प्रतिबिंब प्रशासनातही उमटायला हवे. आता त्याची अधिक गरज आहे. त्यामुळे प्रशासन स्थिर होईल.

गोल बुडाचे भांडे सपाट पृष्ठभागावर ठेवताना डगमगू नये म्हणून जे आयुध वापरतात, त्यास तिकाटणे असे म्हणतात. महाराष्ट्र सरकार हे असे तीन पक्षांच्या तिकाटण्यावर ठेवले गेलेले आहे आणि तरीही त्याची बागबुग कमी झालेली नाही. ते स्थिर न झाल्यास भांडे लवंडण्याचा धोका आहे. अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने तो टाळता येणार नाही.

# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास मोठे यश

### महाड येथील ग्रामीण रुग्णालयातील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनच्या प्रस्तावास शासनाची "विशेष बाब" म्हणून मान्यता



बोरघर / माणगांव ( विश्वास गायकवाड ) रायगड जिल्ह्यातील महाड येथील सध्या ३० बेड्स रुग्ण क्षमता असलेल्या ग्रामीण रुग्णालयातील प्रस्तावित १०० खाटांची रुग्ण क्षमता असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबतच्या प्रस्तावास "विशेष बाब" म्हणून शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा दिनांक 28 जून 2021 रोजीचा शासन निर्णयच जारी करण्यात आला आहे. जिल्ह्यात वैद्यकीय व आरोग्य विषयक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याकरिता पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी सकारात्मकरित्या केलेल्या पाठपुराव्याला मिळालेले हे मोठे यश आहे. कोकण रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग या वाहतुकीच्या सुविधा तसेच जिल्ह्यातील वाढते औद्योगिकरण यामुळे महाड येथील ग्रामीण रुग्णालयास संलग्नतेने कार्यरत असलेले ट्रॉमा केअर युनिटसह ग्रामीण रुग्णालयाचे १०० रुग्ण क्षमता असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर होणे गरजेचे असल्याची बाब राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. तटकरे यांनी काही दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, आरोग्य मंत्री ना.राजेश टोपे यांच्यासमोर मांडली होती. तसेच, महाडचे आमदार भरत गोगावले यांनी देखील पालकमंत्री कु.तटकरे यांच्याकडे या संदर्भात मागणी केली होती. त्यानुषंगाने महाड ग्रामीण रुग्णालयाच्या १०० खाटांची रुग्णसंख्या असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे "विशेष बाब" म्हणून मंजूरी मिळाली आहे. यासाठी पालकमंत्री कुमारी आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री ना.श्री. उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, आरोग्य मंत्री ना.राजेश टोपे यांचे विशेष आभार मानले आहेत. महाड येथे १०० खाटांची रुग्णक्षमता असलेले उपजिल्हा रुग्णालय सुरु झाल्याने येथील सामान्य जनतेची मोठी सोय होणार आहे. तसेच नैसर्गिक आपत्ती, रस्ते व रेल्वे अपघात इत्यादींमुळे बाधित व अपघातग्रस्त रुग्णांवर तातडीने उपचार करणे सुकर होणार आहे. करोना संकटामुळे आरोग्य यंत्रणेवर विशेष भर देताना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा सामान्य रुग्णालय येथे अत्याधुनिक आरोग्यसुविधा, रुग्णालयांची क्षमता वाढविण्यासाठी व बळकटीकरणासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे सदोदित प्रयत्नशील आहेत.

# देवदर्शन घेऊन घरी निघाल्यानंतर वाटेतच काळाने गाठलं; अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

सातारा : कार आणि दुचाकीची जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात दोन जण जागीच ठार झाले असून ५ जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. साताऱ्यातील विखळे ता- खटाव येथील मल्हारपेठ-पंढरपूर या राज्य मार्गावर देशमुख वस्तीनजीक ही घटना घडली. मृतांमध्ये मायणी येथील दुचाकीस्वार युवक आणि कारमधील लातूर जिल्ह्यातील एका व्यक्तीचा



समावेश आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मल्हारपेठ-पंढरपूर या राज्य मार्गावरील विखळे गावच्या देशमुख वस्ती नजीक विखळेकडून मायणीकडे सुरज राजाराम माळी हा युवक दुचाकी घेऊन जात होता. त्याचवेळी समोरून कोल्हापूर येथे देवदर्शन घेऊन सय्यदपूर ता.देवनी,जि. लातूरकडे भरधाव जाणाऱ्या इर्टिगा कारने या दुचाकीस्वाराला भीषण धडक देत रस्त्याच्या बाजूच्या संरक्षण काठड्यास धडक दिली. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार युवक सुरज राजाराम माळी (वय २७ रा.मायणी,ता-खटाव,जि. सातारा) आणि कारमधील संतोष किसनराव बिरादार (वय ४०, रा.सय्यदपूर जि-लातूर) या दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. दुसरीकडे, चारचाकी वाहनातील चालक महेश विठ्ठलराव जळकुटे, जोतिराम धनाजी बिरादार, सौदागर राजकुमार बिरादार, दत्तात्रय भीमराव बिरादार रा.सय्यदपूर ता.देवनी,जि-लातूर या चार व्यक्ती गंभीर जखमी झाल्या असून त्यांना सातारा येथे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्या अडचणींमध्ये वाढ



मुंबई : अँटिलिया स्फोटकं आणि मनसुख हिरन हत्या प्रकरणी एन्काउंटर स्पेशालिस्ट अशी ओळख असलेले माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांच्या अडचणींमध्ये मोठी वाढ झाली आहे. कारण आज प्रदीप शर्मा यांना १२ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांच्यासोबत संतोष शेलार, आनंद जाधवलाही १२ जुलैपर्यंत कोठडी सुनावण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांआधी प्रदीप शर्मा यांची एनआयए कोठडीत रवानगी करण्यात आली होती. या अनुषंगाने शर्मा यांनी वकिलास भेटण्याची परवानगी मागितली असता त्यांना कोर्टाकडून दिलासा देण्यात आला होता. पण त्यांनतर आता कोर्टाकडून १२ जुलैपर्यंत कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आता पुढील चौकशीमध्ये काय माहिती समोर येणार हे पाहणं महत्त्वाचं आहे.

ठाण्यातील व्यापारी मनसुख हिरन हत्या प्रकरणी प्रदीप शर्मा यांना अटक करण्यात आली होती. यानंतर एनआयए कोर्टाने त्यांना २८ जूनपर्यंत कोठडी दिली होती. यामध्ये आज पुन्हा वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, वकिलास भेटण्याची परवानगी मिळावी म्हणून शर्मा यांनी एनआयए कोर्टात अर्ज सादर केला होता. यावर सुनावणी झाली असता कोर्टाने शर्मा यांना दिलासा दिला. प्रदीप शर्मा त्यांच्या वकिलांना दररोज दुपारी १२ ते १२.२० या वेळेत भेटू शकतात, असे परवानगी देताना कोर्टाकडून देण्यात आली होती.

**नेमकं काय आहे प्रकरण?**

उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर स्कॉर्पिओ कारमध्ये स्फोटकं ठेवण्यात आली होती. ही बाब उघड झाल्यानंतर हे प्रकरण नाट्यमय वळणे घेत आहे. त्यात स्कॉर्पिओ मालक मनसुख हिरनची हत्या झाल्यानंतर हे प्रकरण अधिकच गंभीर बनलं. सचिन वाझे यांच्यासह गुन्हे शाखेतील त्यांच्या दोन सहकाऱ्यांना अटक झाल्यानंतर तपासाची व्याप्ती वाढतच चालली आहे. १८ जून रोजी याप्रकरणी प्रदीप शर्मा यांना अटक करण्यात आली. हिरन हत्येप्रकरणात शर्मा हे मास्टरमाइंड असल्याचा संशय एनआयएला असून ठोस पुरावे हाती लागल्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार २९ जून ते ०५ जुलै २०२१


# गरजू व गरीब मुलांसाठी मिरा भाईंदर येथे सोशल राईट्स ने उपलब्ध केले इंडोर क्रिकेट मैदान















प्रशिक्षक म्हणून यांची ख्याती आहे . असे प्रशिक्षक आपल्या मिरा भाईंदर ला लाभले असतांनाही मुलांना शिकवण्यासाठी त्यांना कोणीही मैदान दिले नाही या मुळे मिरा भाईंदर परिसरातील मुले वसई विरार मुंबई येथे जाऊ लागली . मिरा भाईंदर मध्ये इतके मैदान आहेत पण एक तर ती बंद स्वरूपात आहेत व राजकारण्यांच्या ताब्यात आहेत यामुळे मैदानी खेळ खेळण्यासाठी मुले पूढे येत नाहीत . आपल्याच सोसायटीच्या गल्लीगोळात ते खेळ खेळतात . यावेळी उद्घाटनाला आंतरराष्ट्रीय खेळाडू रोहित शर्मा या क्रिकेट पटूला घडवणारे प्रशिक्षक दिनेश लाड , ऍड हंसराज पाटील, नगरसेविका संध्या पाटील , उत्तम प्रशिक्षक प्रफुल्ल नाईक व मिलींद शिरसाट, नहींम खान व सोशल राईट्स चे संस्थपाक पोलीस बातमी चे संपादक दीपक मोरेश्वर नाईक उपस्थित होते . महिलांनी मागे राहू नये त्यांनीही क्रिकेट मध्ये भाग घ्यावा असे आवाहन सोशल राईट्स महिला आघाडी प्रमुख श्रेया जाधव यांनी केले . यावेळी मानवाधिकार च्या संपादिका प्रिती दिपक नाईक हि उपस्थित होत्या .ज्यांनी रोहित शर्मा ला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेऊन ठेवले ते प्रशिक्षक दिनेश लाड यांनी गरजू व होतकरू मुलांना मी मोफत शिकविणार असे जाहीर केले . इतके मोठे प्रशिक्षण मिरा भाईंदर ला लाभले असूनही त्यांची दखल कोणी घेत नाही असे उद्गार सोशल राईट्स चे संस्थापक दीपक मोरेश्वर नाईक यांनी काढले .

## मुंबईतील 50 टक्क्यांपेक्षा अधिक लहान मुलांमध्ये आढळल्या अँटीबॉडीज



राज्यात कोरोनाची दुसरी लाट ओसरत नाही तोवर तिसऱ्या लाटेची भीती वर्तवली जात आहे. डेल्टा प्लस व्हेरियंटमुळे राज्यात येत्या काही दिवसांमध्ये कोरोनाची तिसरी लाट उद्धवणार असा अंदाज व्यक्त होत आहे. या तिसऱ्या लाटेचा सर्वाधिक प्रभाव लहान मुलांवर जाणवेल असेही सांगितले जात होते. याच पार्श्वभूमीवर कोरोनाची तिसरी लाट थोपवण्यासाठी मुंबई महानगरपालिका सज्ज झाली आहे. मुंबई पालिकेना लहान मुलांना होणार धोका लक्षात घेता एक सेरो सर्व्हे केला होता. या सर्व्हेमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक लहान मुलांमध्ये कोरोनाविरोधी अँटीबॉडीज आढळल्या आहे. त्यामुळे मुंबईकरांना काही प्रमाणात दिलासा मिळत आहे. मुंबई महानगरापालिकेने मुंबईतील २४ वॉर्डमध्ये मे आणि जून महिन्यात ६ ते १८ वयोगटातील एकूण १० हजार मुलांचा सर्व्हे केला. लहान मुलांना कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा धोका असल्याचे वर्तवले जात असल्याने पालिकेने हा सेरो सर्व्हे केला होता. यात मुंबईतील बहुतांश लहान मुलांमध्ये गेल्या चार ते पाच महिन्यात कोरोनाविरोधातील रोगरप्रतिकार शक्ती तयार झाली असल्याने कोरोनाच्या तिसऱ्या लाटेपासून त्यांच्या सुरक्षित बचाव होणार आहे. असे स्पष्ट केले आहे.

यात मे आणि जून महिन्यादरम्यान ६ ते १८ वयोगटातील एकूण १० हजार मुलांचे नमुने घेण्यात आले होते. मुंबई महापालिकेच्या या तिसऱ्या सेरो सर्व्हेमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक लहान मुलांमध्ये अँटीबॉडी आढळल्याचा दावा पालिकेकडून करण्यात आला आहे.

## मुंबईत 11 वर्षात विविध दुर्घटनांत 1 हजार 525 जणांचा बळी

मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरात दररोज कुठे ना कुठे, लहान- मोठ्या दुर्घटना घडत असतात. त्यात कमी- अधिक प्रमाणात जीवित व वित्तीय हानी होते. विशेषतः पावसाळ्यात तर मोठ्या प्रमाणात दुर्घटना घडतात. २०१० ते २०२० या ११ वर्षांच्या कालावधीत मुंबईत विविध प्रकारच्या ८५ हजार ६९४ दुर्घटना घडल्या आहेत. त्यामध्ये, १,५२५ जणांचा मृत्यू झाला असून ५,३८६ जण जखमी झाले आहेत. राज्य सरकार व महापालिका प्रशासन या दुर्घटना रोखण्यासाठी विविध उपाययोजना करते मात्र तरीही काही कारणास्तव त्यात काही हलगर्जीपणा, निष्काळजीपणा होऊन शेवटी दुर्घटना घडणे, त्यात शेकडो लोकांचा बळी जाणे आणि शेकडी लोक जखमी होणे, हा दरवर्षीचा नित्यक्रम काही थांबत नाही. मुंबई शहर हे देशाचे आर्थिक राजधानीचे आणि श्रीमंत शहर आहे. या शहराची लोकसंख्या १.७० कोटींच्या घरात असून दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबईत मिठी, पोयसर, दहिसर अशा नद्या, मोठमोठे नाले, झोपडपट्ट्या, जुन्या इमारती, झोपडीवजा बेकायदा बहुमजली इमारती,झोपडपट्टीतील लघु उद्योग, टपऱ्या, हॉटेल्स, केमिकल कंपन्या आहेत. बाजूला अथांग समुद्र, खाडी आहे. वाहनांची वाढती संख्या. पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास नद्या, नाले तुडुंब होऊन वाहू लागतात. मुंबईची तुंबई होते. अशा या मुंबईत विविध प्रकारच्या शेकडो दुर्घटना घडतात. यामध्ये, काही दुर्घटना या अचानकपणे तर काही सरकार, पालिका, प्राधिकरण यांचा हलगर्जीपणा, मानवी स्वभाव, स्वार्थीपणा आणि निष्काळजीपणा आदी कारणामुळे या दुर्घटना घडतात. त्यामध्ये शेकडो लोक जखमी होतात, तर अनेकांचा नाहक मृत्यू होतो. शिवाय मोठी वित्तीय हानीही होते.११ वर्षात ८५,६९४ दुर्घटनांत १५२५ मृत, ५३८६ जखमी गेल्या २०१० पासून ते २०२१ या ११ वर्षांच्या कालावधीत मुंबई शहर व उपनगरात दरड कोसळणे, घर, इमारत,झाडे, यांची पडझड, समुद्र, नद्या, नाले, विहीर, खाडी यात बुडणे, रस्त्यावर ऑइल पडणे, मॅनहोलमध्ये पडणे, गॅस गळती, आग व शॉर्टसर्किट आदी विविध प्रकारच्या तब्बल ८५ हजार ६९४ दुर्घटना घडल्या आहेत. यामध्ये, ५ हजार ३८६ लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिक किरकोळ ते गंभीर जखमी झाले आहेत. काहीजण अव्यव गमावल्याने कायमचे दिव्यांग झाले आहेत. तर १ हजार



५२५ नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दरवर्षी सरासरी ७७९० दुर्घटना, १३८ मृत्यू, ४८९ जखमी मुंबईत दरवर्षी सरासरी ७ हजार ७९० दुर्घटना घडल्या आहेत. त्यामध्ये दरवर्षी सरासरी ४८९ जण किरकोळ ते गंभीर जखमी झाले असून १३८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे निदर्शनास येते. कोणत्या दुर्घटना, किती मृत, जखमी मुंबईत गेल्या ११ वर्षात, समुद्र, खाडी, विहीर, नद्या, नाले, मॅनहोल, खड्डे यात लहान मुले ते मोठी माणसे पडण्याच्या व बुडण्याच्या १,२५३ घटना घडल्या आहेत. त्यामध्ये, ६६१ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून २८४ जण जखमी झाले आहेत. तसेच, आग लागणे व शॉर्टसर्किट यांच्या तब्बल ३३,७८७ दुर्घटना घडल्या असून त्यामध्ये ३६१ जणांचा मृत्यू झाला तर २,३२० लोक जखमी झाले आहेत. दरड कोसळण्याच्या १७८ दुर्घटना घडल्या असून त्यामध्ये २२ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर ३४ जण जखमी झाले आहेत.

## वालीव पोलीस स्टेशनच्या हद्दीत सापडला अनोळखी पुरुषाची मृतदेह



दि.२३/०६/ २०२१ रोजीचे ११:३० बा. पुर्वी बालब पोलीस स्टेशनच्या हद्दिमध्ये मुंबई अहमदाबाद महामार्ग क्रं. ८ ची मुंबई वाहनीवरील मौजे. पेल्हार गाबचे हद्दीतील राशद कंम्पाऊड समोर, सर्विस रोड लगत असलेल्या गबतामध्ये नालासोपारा (पु.), ता. बसई, जि. पालघर येथे एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह मळून आला असून सदर अनोळखी पुरूषाचे अंदाजे बव ४५ ते ५० वर्षे, रंग सावळा, उंची ०५ फुट ०६ इंच, डोक्याचे केस काळे ब सफेद रंगाचे कलर केलेले. २ ते ३ इंच लांबीचे केस, डोळे बंद स्थितीत, डाबे डोळयाची पापणीची त्वचा सफेद झालेली, नाक नाकाचे डावे बाजुची त्वचा सफेद झालेली, कान मोठे, त्यामध्ये डावे कानाचे पाळीमध्ये सफेद बुरशी आलेली ब लालसर द्रव आलेले, मिशी बाढलेली, दाढी खालच्या ओठाचे खाली दाढी वाढलेली, चेहरा उभट, अंगाने मजबुत, अंगात सफेद रंगाचे हाफ बनियान, नेसुस काळया रंगाची हाफ बरमुडा पँट, उजवे हाताचे मनगटाबर लाल, केसरी, काळा रंगाचा धागा बांधलेला, अशा वर्णनाच्या अनोळखी पुरूषास कोणीतरी अज्ञात आरोपीने कोणत्या तरी अज्ञात कारणावरून मारहाण करुन त्यास जिवे ठार मारुन पुराबा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यास मोजे पेल्हार गाबाचे हद्दीमध्ये गवतात टाकुन देवुन नघुन गेला अशा फिर्यादीवरून ब्यालब पोलीस स्टेशन येथे गुरनं ५९४/२०२१ भा.दं.बि.सं. कलम ३०२,२०१ प्रमाणे दि.२५/०६/२०२१ चे २०:३५ वा. गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तरी नमूद गुन्हयातील अनोळखी मयत पुरूष ब त्याचे बारसदार यांचा शोध लागणे गरजेचे असून सदरची माहती वर्तमानपत्रामध्ये प्रासध्द होणेस विनंती आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास पोन. कारंडे मो क्र ९२२२२३३८७६, ०२५० २४५४४०० हे करीत आहे.

## पालिकेच्या शाळांमधील 1300 वर्ग खोल्यांत डिजिटल वर्ग सुरु होणार

जगभरात डिजिटल शिक्षणाचा बोलबाला आहे. मुंबई महापालिकेनेही शैक्षणिक क्षेत्रात आधुनिकतेची कास धरत विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण देण्याच्या दिशेने आपली पावले टाकली आहेत. पालिका आपल्या शाळांमधील १३०० वर्ग खोल्यांमध्ये इयत्ता पहिली ते दहावी च्या विद्यार्थ्यांसाठी 'डिजिटल वर्ग' सुरू करणार आहे.त्यामुळे आता पालिकेतील लाखो विद्यार्थी हे




नामांकित खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांप्रमाणेच आधुनिक शिक्षण घेऊ शकणार आहेत. या संगणकाच्या युगात त्यांचा शैक्षणिक व बौध्दिक विकास अधिक चांगल्या पद्धतीने होऊन त्यांना पुढे सरकारी, खासगी नोकरी, उद्योग, व्यवसाय करणे अधिक सुकर होणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव स्थापत्य समिती (उपनगरे)च्या आगामी बैठकीत मंजुरीसाठी येणार आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898